# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १०५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १६ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



संपादकीय ......

# जित्याची खोड...

आम्ही शांततेत राहावे म्हणून युद्ध करतो असे प्रख्यात ग्रीक तत्वज्ञ रिस्टॉटल याचे वचन आहे. त्याची प्रचिती मोदी यांनी काही दिवसांपासून सुरू असलेल्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात आणून दिली. मोदी यांचा युद्धाचा आडाखा अचूक होता. भारताने पाकच्या नागरिकांवर हल्ले केले नाहीत. पाकच्या मांडीवर बसून भारतातील निरपराध नागरिकांना कंठस्नान घालणाऱ्या दहशतवाद्यांना टार्गेट केले. हे युद्ध होते आणि पाकचा या युद्धात सर्वंकष पराभव झाला, तसा तो पूर्वीही साडेतीन वेळा झाला आहे. पण आता तर तो जास्तच परिणामकारक आणि प्रिसिजन म्हणजे अचूक हल्ला होता असे म्हणावे लागेल. मोदी यांचे अचूक अंदाज आणि आडाखे किती अचूक आहेत याचा अंदाज येतो. वास्तविक हे युद्ध पारंपरिक अर्थाने नव्हते, तर हा पाकच्या नापाक इराद्यांना जमीनदोस्त करण्याच्या इराद्याने भारताने पाकला शिकवलेला धडा होता. पहलगाम येथे पाकच्या दहशतवाद्यांनी पर्यटकांवर नृशंस हल्ले केले आणि त्यांचे कपडे काढून त्यांना ठार मारले. अनेकांना कलमा पढायला लावला आणि ज्यांना तो येत नव्हता त्यांना पॉइंट ब्लॅक गोळ्या घातल्या. या दहशतवाद्यांना मोदी यांनी धडा शिकवण्याचा निर्धार केला आणि तो अमलातही आणला. या जागी नेहरू किंवा काँग्रेसचे सरकार असते तर मुळमुळीत निषेधाचे खलिते धाडत बसले असते. पण मोदी आणि नेहरू किंवा काँग्रेस यांच्यात हा गुणात्मक फरक आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपाचे सरकार आपल्याला नेमके काय हवे आहे हे निश्चित जाणते आणि तसेच करते. त्यामुळे मोदींची लोकप्रियता पराकोटीची वाढली आहे. पण येथे मोदी यांच्या लोकप्रियतेचा प्रश्नच नव्हता. ज्या भारताच्या निरपराध भगिनींनी आपले कुंकू गमावले त्यांच्या पतींच्या हत्येचा बदला घेणे आवश्यक होते आणि तेच मोदी यांनी केले. त्यामुळे या कारवाईला मोदी यांनीच 'ऑपरेशन सिंदूर' हे सार्थ नाव दिले.

भारताला आता विरोधक शहाणपणा शिकवत आहेत की, भारताने युद्ध का केले नाही आणि पाकला संपूर्ण उद्धवस्त करायला हवे होते. जर तसे केले तर हेच विरोधक बोंबलत गेले असते की मोदी सरकारने पाकच्या लोकांना ठार मारले म्हणून. त्यामुळे मोदी यांनी शांत राहून आपला बदला घेतला आणि महिलांना न्यायही दिला आहे. पाकच्या कोणत्याही भुलावणीस बळी पडू नये हे जाणून मोदी यांनी पाकला आता त्यांच्या दहशतवाद्यांच्या अड्यांना उद्धवस्त केले आहे. जर लोकांना मारले असते तर पाक गाऱ्हाणी घेऊन बोंबलत गेला असता. पण आता त्याला ती संधी नाही. कारण भारतीय लष्कराने दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ले करून ते बेचिराख केले आहेत. यातच मसूद अझर याच्या कुटुंबीयांचा खात्मा झाला आहे. हा मसूद अझर म्हणजे तोच की ज्याने कंदाहार येथे विमान अपहरण प्रकरणात भारतीयांना ओलिस ठेवले होते आणि त्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहिला होता. त्याचे नऊ कुटुंबीय ठार झालेत, तर दुसरा एक दहशतवादी अब्दुल रऊफ हा देखील या 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये ठार झाला आहे. हे युद्ध नव्हते तर पाकला त्याच्या जबरदस्त आगळीकीबद्दल तितकीच न भूतो न भविष्यती अशी शिक्षा होती. दहशतवादी आता हा धडा धेऊन चुकले असतील. आता भारतात काँग्रेसचे सरकार नाही, तर मोदी यांच्या भाजपाचे राज्य आहे आणि ते आपल्याला थोड्याही चुकीचे प्रायश्चित्त देते. पाकच्या शस्त्रसंधीवर भारताचा विश्वास नाही. त्यामुळे आता भारताने पाकला ठणकावून सांगितले आहे की यापुढे जर पाकने कोणतीही आगळीक केली, तर ते भारताविरोधात युद्ध पुकारले असा त्याचा अर्थ धेतला जाईल. यामुळे पाक आधीच गर्भगळीत झाला आहे. मोदी यांनी सिंधू जल करार स्थगित राहील अशी व्यवस्था केली आहे. त्यामुळे पाकच्या नाकातोंडात पाणी गेले आहे आणि त्यामुळे त्यांची शेती पाण्याअभावी सुकणार आहे. तसेच कित्येक आर्थिक उपाय योजले आहेत ज्यामुळे पाकचे जिणे मुश्किल होणार आहे. पाकला शिकवला तो धडा पुरेसा नसला तरीही सध्या तरी इतके पाकला आपल्या चुकीची जाणीव करून देणे आवश्यक होते आणि ती मोदी यांनी करून दिली आहे. भारताने या ऑपरेशनमध्ये दहशतवादी तळांवर हल्ले करून ते उद्धवस्त केले. हे यश फार मोठे आहे. भारताने कुठेही जनतेला ढाल केले नाही. त्याउलट पाकने त्याच्या स्वभावानुसार आपल्याच जनतेला ढाल करून भारतीय लष्करांवर हल्ले केले होते. पण ते हल्ले सर्व फोल ठरले. आता पाकला असा धडा शिकवला आहे की काही वर्षे तरी तो यातून डोके वर काढू शकणार नाही. पाकच्या कारवाया बंद तर होतीलच पण दहशतवादी ज्यांनी पहलगाम हत्याकांड घडवले त्यांना वेचून ठार मारण्यावर आता भारत लक्ष केंद्रित करेल. कारण भारताची ही जखम आहे की, जे दहशतवादी या हल्ल्याला जबाबदार आहेत ते तर पळून गेले आहेत. त्यांना जोपर्यंत शिक्षा होत नाही तोपर्यंत भारताचा बदला अपुरा राहील. आता पाकला शांततेची शिकवण याद येते आहे. पाकचे दैनीक 'द डॉन'मध्ये उपदेशाचे डोस पाजले आहेत की युद्ध कसे चुकीचे आहे. पण अगोदर कुणी सुरुवात केली आणि इतके दिवस पाक तेच करत होता. आता भारताकडून जशास-तसे किंबहुना त्यापेक्षाही कडवे उत्तर मिळायला लागले म्हणून पाकला आता शांतता आठवते आहे. शांतता हवी असेल तर ताकदवान असावे लागते. दुर्बळांच्या आवाहनाला कुणीही प्रतिसाद देत नाही. भारताने हे सिद्ध केले आहे. पाकने मात्र आपण अद्यापही सुधारत नाही असे वारंवार सिद्ध केले आहे. त्याने शस्त्रसंधी झाल्यावरही आगळीक सुरूच ठेवली आहे. पाकचे ड्रोन भारतीय हद्दीत येत आहे आणि त्यामुळे कित्येक घरांचे नुकसान झाले आहे. तसेच काही ठिकाणी माणसेही ठार झाली आहेत. पाकला कोणत्याही परिस्थितीत सामंजस्याचे बोलणे समजत नाही. त्याला बरबादीची भाषाच समजते. तसे असेल तर भारतही त्यास आता तसेच उत्तर देईल. मोदी यांनी पाकला धडा तर शिकवला आहे पण पाक ते समजणार नसेल तर पाकशी सर्वंकष हल्ल्याची भाषा करावी लागेल. अजूनही पाकच्या कुरापती काढण्याचे उद्योग सुरूच आहेत. त्या थांबल्या नाहीत, तर भारताला अखेरचा घाव घालावा लागेल. मग पाकला जगातील कोणताही देश वाचवू शकणार नाही हे सत्य आहे.

# उन्हाळी भुईमुंगाची काढणी कधी आणि कशी कराल? जाणून घ्या सविस्तर




**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

भुईमुगाच्या काढणीच्यावेळी जमिनीत थोडी ओल असल्यास काढणीचे काम सोपे होते. शक्यतो काढणीच्या काळात ऊन भरपूर असल्यास काढणीचे काम चांगले होते. पुढे चांगले ऊन मिळेल म्हणून काढणीस उशीर केला तर उपट्या जातीतील शेंगाच्या दाण्यांना आतल्या आत मोड येऊ शकतात. पुढे अधिकच उशीर केला तर शेंगांना मोड फुटतात व मोठे नुकसान संभवते.

काढणी अगोदर शेंगा पक्व होऊन गेल्या असतील तर दाणे काळे पडतात व उत्पादनाची प्रत खालावून बाजारभाव कमी मिळतो. काढणी लवकर केल्यास शेंगांमध्ये अपक्व दाण्याचे प्रमाण जास्त राहते. त्यामुळे उत्पादन कमी येते, उत्पादनाची प्रत घटते, शेंगातील दाण्यात तेलाचे प्रमाण कमी राहते. खूपच उशिरा काढणी केल्यास जमीन टणक होऊन पुष्कळच्या शेंगा जमिनीतच राहतात. त्या खणून काढाव्या लागल्याने काढणीचा खर्च वाढतो.

त्याकरिता भुईमुगाची काढणी योग्य वेळीच करणे गरजेचे असते. भुईमुगाचे पीक काढणीस तयार झाले किंवा नाही, हे पाहण्याकरिता शेतातील ठिकठिकाणची काही झाडे उपटून शेंगा पक्व झाल्या की नाही हे पाहावे. जेव्हा ढाळ्यास पक्व शेंगाचे प्रमाण जास्त आहे असे दिसून येईल, ती वेळ काढणीस योग्य आहे, असे समजावे. यावेळी भुईमुगाची पाने पिवळी होऊन गळू लागतात.

शेंगाची जेव्हा पूर्ण वाढ झालेली असते तेव्हा शेंगाच्या टरफलाची आतली बाजू काळसर दिसू लागते. शेंगातील दाणा पूर्णपणे भरलेला असल्यास व त्यावर रंग आलेला असल्यास शेंगा पूर्ण पक्व झाल्याचे समजण्यास हरकत नाही. पूर्णपणे पक्व झालेली शेंग हाताच्या बोटाने दाबली असता ती लवकर फुटत नाही. यावरून भुईमुगाचे पीक काढणीस आले की नाही हे ठरविता येते.

उपट्या जातीचे वेल उभट वाढतात. त्यामुळे ते उपटून घेऊन हाताने शेंगा तोडून काढाव्यात. पसऱ्या जातीचे वेल लहान कुळवावर उभे राहून फिरवून गोळा करावेत. नंतर जमिनीत असलेल्या शेंगा खोल कुळव चालवून किंवा खुरप्याने चाळण करून किंवा लाकडी नांगराच्या साह्याने नांगरून काढाव्यात. वेलाच्या शेंगा काढल्यावर त्या खळ्यावर ७ ते ८ दिवस चांगल्या वाळवाव्यात.

**– डॉ. कल्याण देवळाणकर, सेवा निवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी तर्फे इंटरनॅशनल कॉन्फरन्स "ICETSF 2025' चे आयोजन

## इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी फॉर सस्टेनेबल फ्युचर या विषयावर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**



पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती आणि एमजी एरिसेन्ट एज्युकेशनल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी फॉर सस्टेनेबल फ्युचर (ICETSF) २०२५' चे आयोजन दिनांक १७ व १८ मे २०२५ रोजी करण्यात आले आहे.

ही पहिली आंतरराष्ट्रीय शैक्षणिक परिषद हॉटेल ग्रँड महफील, अमरावती येथे पार पडणार असून, याचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील व उपाध्यक्ष श्रेयस दादा पोटे पाटील यांच्या हस्ते, तसेच प्राचार्य, उपप्राचार्य, आणि डीन यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.या कॉन्फरन्समध्ये ५०० पेक्षा अधिक रिसर्च पेपर प्राप्त झाले असून भारतासह युएसए, तायवान, थायलंड, इंडोनेशिया, बांगलादेश, स्पेन, मोरोक्को, इजिप्त येथील संशोधक आपले विचार मांडणार आहेत. हे सर्व रिसर्च पेपर्स डउजझणड इंडेक्समध्ये प्रकाशित होणार असल्याने संशोधन क्षेत्रात महत्वाची भर पडणार आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या प्रमुख मार्गदर्शक वक्त्यांमध्ये डॉ. हाईपेंग लुई (कव्हेन्ट्री युनिव्हर्सिटी, यूके), डॉ. ललित गर्ग (युनिव्हर्सिटी ऑफ माल्टा), डॉ. दीपिका कौंडल (युनिव्हर्सिटी ऑफ ईस्टर्न फिनलंड), डॉ. नेझा मेजाद (नॅशनल सेंटर फॉर न्युक्लिअर एनर्जी सायन्स अँड टेक्नॉलॉजी, मोरोक्को) यांचा समावेश असून ते सहभागी विद्यार्थ्यांना व संशोधकांना मार्गदर्शन करणार आहेत.कॉन्फरन्समुळे पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचा संशोधन क्षेत्रातील दृष्टिकोन अधोरेखित होत असून, विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर शिकण्याची, संवाद साधण्याची आणि नवकल्पना मांडण्याची ही सुवर्णसंधी ठरणार आहे, असे आयोजकांनी सांगितले.







# जेवणानंतर ' या ' ५ गोष्टी करणे तातडीने थांबवा, त्यामुळेच बिघडते तब्येतीचे गणित कायमचे

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

१. काही जणांना जेवल्यानंतर लगेच काही तरी गरम प्यायची सवय असते. जसे की चहा पितात किंवा मग कॉफी. जेवणानंतर असे कोणतेच पेय पिऊ नये. तसेच जेवणा आधी चहा कॉफी घेऊ नये. आयसीएमआर च्या साईटवरही हे नमूद केलेले आहे की जेवणानंतर काही गरम पेय प्यायल्याने अन्नातील पोषण शरीराला मिळत नाही. खास करुन अन्नातील आयर्न वाया जाते. त्यामुळे जेवण नंतर चहा किंवा कॉफी पिण्यामध्ये किमान एक ते दोन तासाचा कालावधी जावा.

२. जेवणानंतर लगेच फळे खाणे शरीराला फायद्याचे ठरत नाही. फळे फार पौष्टिक असतात. मात्र कोणत्याही वेळी खाऊ नयेत. जेवणानंतर लगेच फळे खाल्याने फळांचे फर्मेंटेशन होते. त्यामुळे पोटात गॅस तयार होतो. पचनही व्यवस्थित होत नाही.

३. आपल्याला घरातील अनुभवी लोक कायम सांगतात जेवल्यानंतर लगेच आडवे पडू नये. फेरफटका मारावा झोपण्याची वेळ आणि जेवणाची वेळ याती किमान एका तासाचे अंतर असावे. जेवल्यानंतर लगेच आडवे पडलात तर पचन व्यवस्थित होत नाही तसेच पित्ताचे प्रमाण वाढते. पोट दुखायला लागते. अपचन होते. त्यामुळे जेवल्यावर कधीच लगेच झोपायचे नाही.

४. जेवणानंतर लगेच अंघोळीला जाऊ नये. जेवणानंतर लगेच अंघोळ केल्याने पचनाची क्रिया मंदावते. अंघोळ करताना पोटाभोवतीचे रक्ताभिसरण इतर अवयवांच्या दिशेने होते आणि पोटाला गरजेच्या असणाऱ्या क्रिया हळू होतात.

५. जेवल्यानंतर लगेच दात घासल्याने दातांचा सगळ्यात वरचा इनॅमलचा थर कमी होतो. त्याची झीज होते. दातासाठी ही लेअर फार गरजेची असते. त्यामुळे जेवल्यानंतर लगेच दाताला ब्रश लावायचा नाही. कोलंबिया युनिवर्सिटीच्या साईटवर सांगितल्यानुसार, जेवणाच्या तासभरानंतरच दात घासा, जेवल्या-जेवल्या दात घासू नका.

# आदिवासींसाठी महाअभियान ठरले लाभदायक

## धरती आबा, प्रधानमंत्री महाअभियान गावांसाठी संजिवनी

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१६अमरावती**



आदिवासी समुदायाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी केंद्र शासनाने 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' आणि 'प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियान' सुरू केले आहे. हे अभियान जिल्ह्यातील आदिवासी आणि दुर्गम भागातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि लाभदायक ठरत आहेत.

या अभियानांतर्गत आदिवासी बहुल भागातील पक्की घरे, रस्ते, पाणी, वीज, सौरऊर्जा, मोबाईल नेटवर्क, गॅस जोडणी, वसतिगृह, पोषण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधांवर विशेष मोहिमेद्वारे लक्ष केंद्रित केले जात आहे. सुविधांपासून वंचित असलेल्या आदिवासी कुटुंबांना याचा लाभ मिळत आहे.

प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियानात धामणगाव रेल्वे तालुक्यातील तीन गावाचा समावेश आहे. यात ३३४ आदिम जमातीची लोकसंख्या आहे. या अभियानातून उसळगव्हाण येथील १७ आणि बोरगाव धांडे येथील चार अशा २१ लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजुरी झाले. यातील २० घरकुलांचे काम पुर्ण झाले आहे. सन २०२५-२६ या वर्षात नायगाव ता. धामणगाव रेल्वे येथील २० लाभार्थ्यांना घरकुल मंजुर करण्यात येणार आहे. या गावामध्ये आदिम जमातींचे आधार कार्ड, जात प्रमाणपत्र, राशन कार्ड, किसान सन्मान निधी व इतर आवश्यक कागदपत्रांची कार्यवाही अभियानातून करण्यात आली आहे.

धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानात अमरावती, अचलपूर, भातकुली, चांदुरबाजार, चिखलदरा, दर्यापुर, धारणी, मोर्शी, वरुड या ९ तालुक्यामधीत ३२१ आदिवासी बहुल गावाचा समावेश आहे. अभियानातून धारणी प्रकल्पांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळेत दोन मुलांचे आणि चार मुलींचे असे सहा वसतिगृह मंजूर झाली आहे. तसेच या अभियानातून आदिवासींना लाभ देण्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्रांची पुर्तता करून लाभ देण्यात येत आहे. तसेच मेळघाटमध्ये पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीसाठी लाभार्थ्यांना विविध लाभ देऊन बाजारपेठेचा विकास करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या अभियानांमुळे अमरावती जिल्ह्यातील आदिवासी समाजात सकारात्मक बदल दिसून येत असून त्यांच्या जीवनात सुधारणा होत आहे.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी, प्रशासनातर्फे अभियानाची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. धरती आबा आणि प्रधानमंत्री आदिवासी न्याय महाअभियानाच्या माध्यमातून आदिवासी भागात शाश्वत विकासाची पायाभरणी होत आहे. यातून मुलभूत सुविधा गावापर्यंत पोहोचत आहे. यातून आदिवासींच्या जीवनात सकारात्मक बदल घडत असल्याचे सांगितले.

धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी, योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधण्यात येत आहे. स्थानिक गरजा आणि भौतिक सुविधांमधील कमतरता ओळखून योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. यातून आदिवासींच्या सर्वांगीण विकासाला गती मिळत असल्याचे सांगितले.

# तर मागासवर्गीय पालकांसाठी परदेशात शिक्षणाची अर्ज करण्याची अंतिम तारीख १७ मे पर्यंत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

इतर मागास बहुजन कल्याण देशाच्या विभाग या विजाभज, इमाव आणि विमाप्र प्रवर्गातील कक्षात उच्च शिक्षणासाठी उपलब्ध आहे. या विभागामार्फत परदेश येत आहे शिष्यवृत्ती योजना राबत असून, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अर्ज मागण्यासाठी आले आहेत. अंतिम तारीख १७ मे २०२५ पर्यंत आहे. या शिष्य प्रश्नार्थी प्रश्न, ज्या पात्रता पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका पदविका आणि पीएचडी निवडीसाठी एस मानानुसार अनुक्रमांक २०० विद्यापीठांमध्ये निश्चित केले, ते विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र असतील. या पुढील विषय एकूण ७५ सामाजिक शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. शिष्यवृत्तीसाठी विविध आणि शाखानिहाय जागची उपलब्धता आहे.

इच्छुक आणि पात्र पात्रनी विहित नमुन्यातील अर्ज ͺww.obcbahujankalyan.maharashtra.gov.in qH$dm https://obcbahujankalyan. maharahstra.gov.in या संकेतस्थळ मतदारसंघ डाउनलोड करा. पूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रे ०६१७ मे २२५ रोजी सकाळी १५.१५ वाजेपर्यंत समक्ष किंवा पोस्ट इतर मागास बहुजन कल्याण कॉम्प्लेक्सालय, प्रिमसेस, अंतिम मजला एम.एच. बी म्हाडा कमशिरल कॉम्प्लेक्स, समता नगर, येरवडा पुणे ४११००६ येथे दोन प्रती कॉल, सादरीकरण आव्हान सादर करण्यात आले आहे.

पात्र वाहनधारक या उमेदवारांचा लाभ घेण्यासाठी इतर मागण्यांचे बहुजन कल्याण विभाग सहायक संचालक गजेंद्र मालठाणे यांनी केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १०५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १६ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## ऑपरेशन सिंदूर अजून संपलेलं नाही

### हा फक्त ट्रेलर, योग्य वेळ आल्यावर पूर्ण चित्रपट दाखवू - संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६भुज**




ऑपरेशन सिंदूरनंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह शुक्रवारी भुज एअरबेसवर पोहोचले. जवानांची भेट घेत त्यांनी त्यांचं भरभरून कौतुक केलं. राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला कडक इशारा देत म्हटलं की, ऑपरेशन सिंदूर अजून संपलेलं नाही. हा फक्त ट्रेलर आहे. योग्य वेळ आल्यावर जगाला पूर्ण चित्रपट दाखवू. संरक्षणमंत्र्यांनी भारतीय हवाई दलाचं खूप कौतुक केलं आहे.

आपल्या हवाई दलाची पोहोच ही पाकिस्तानच्या प्रत्येक कोपऱ्यापर्यंत आहे, ही काही छोटी गोष्ट नाही, हे आता पूर्णपणे सिद्ध झालं आहे. आज परिस्थिती अशी आहे की, भारताची लढाऊ विमानं हे सीमा ओलांडल्याशिवाय येथून देशाच्या प्रत्येक कोपऱ्यात मारा करण्यास सक्षम आहेत. संपूर्ण जगाने पाहिलं आहे की, तुम्ही पाकिस्तानी भूमीवरील नऊ दहशतवादी अड्डे कसे उद्ध्वस्त केले.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान तुम्ही जे काही केलं त्यामुळे सर्व भारतीयांना अभिमान वाटला आहे, मग ते भारतात असोत किंवा परदेशात. पाकिस्तानमध्ये वाढणाऱ्या दहशतवादाला चिरडून टाकण्यासाठी भारतीय हवाई दलाला फक्त २३ मिनिटं पुरेशी होती. लोकांना नाश्ता करायला जितका वेळ लागतो, तितक्या वेळात तुम्ही तुमच्या शत्रूंना संपवलं असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

पहलगाममध्ये त्यांनी धर्म विचारून मारलं आणि आम्ही दहशतवाद्यांना, पाकिस्तानला त्यांचं कर्म पाहून अद्दल घडवली. मी जगाला विचारू इच्छितो की, अशा बेजबाबदार आणि दुष्ट राष्ट्राच्या हातात अण्वस्त्र सुरक्षित आहेत का? पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या सर्व निष्पाप नागरिकांना आणि 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान शहीद झालेल्या आपल्या जवानांना मी श्रद्धांजली अर्पण करतो असं केंद्रीय संरक्षण मंत्र्यांनी म्हटलं आहे.

## जमिनीवरून हल्लाबोल, हवेतच केले उद्ध्वस्त
## भारताने पाकिस्तानवर डागली १३ ब्रह्मोस क्षेपणास्त्रे!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**




भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू केल्यानंतर पाकिस्तानची चांगलीच घाबरगुंडी उडाली होती. पाकिस्तान भारतावर हल्ला करण्याचे सतत अयशस्वी प्रयत्न करत होता. या हल्ल्यात पाकिस्तान ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करत होता. या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याने ब्रह्मोस क्षेपणास्त्रांचा वापर केला. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने पाकिस्तानी हवाई तळांवर १५ ब्राह्मोस डागले होते, याची माहिती संरक्षण मंत्रालयाशी संबंधित एका सूत्राने दिली.९ आणि १० मेच्या रात्री, भारतीय हवाई दलाने इतर दलांच्या मदतीने पाकिस्तानच्या १३ पैकी ११ हवाई तळांना लक्ष्य केले आणि चीनची हवाई संरक्षण प्रणाली नष्ट केली. भारतीय हवाई दलाच्या या कृतीमुळे असीम मुनीर यांच्या पाकिस्तानी सैन्यात चांगलीच खळबळ उडाली.

पाकिस्तानी सैन्य भारतावर हल्ला करण्याचा सतत अयशस्वी प्रयत्न करत होते. या दरम्यान देशातील २६ ठिकाणी ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून हल्ला करण्याचे प्रयत्न करण्यात आले. प्रत्युत्तरादाखल भारतीय सैन्याने पाकिस्तानवर हल्ला केला. त्यांनी लाहोरमध्ये असलेल्या शत्रूच्या रडारसह पाकिस्तानी हवाई संरक्षण रडारला लक्ष्य केले. भारताने पाकिस्तानवर सुमारे १५ ब्रह्मोस क्षेपणास्त्रे डागली होती. भारताच्या अचूक हल्ल्यांमध्ये, पाकिस्तानचे भरपूर नुकसान झाले. या संपूर्ण ऑपरेशनचे नेतृत्व भारताचे संरक्षण प्रमुख आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांनी संयुक्तपणे केले. ही रणनीती अशा प्रकारे बनवण्यात आली की, पाकिस्तान स्वतःच फसला गेला.

**पाकिस्तानचे सगळे हल्ले परतवले!**

पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचे अनेक प्रयत्न केले होते. यासाठी त्यांनी तुर्की बनावटीचे ड्रोन आणि चिनी शस्त्रे वापरली. मात्र, ही शस्त्रे आणि क्षेपणास्त्रे भारतीय संरक्षण यंत्रणेसमोर एक मिनिटही टिकू शकली नाहीत. पाकच्या ड्रोननी भारतीय सीमेत प्रवेश करताच संरक्षण यंत्रणांनी त्यांना हवेतच उडवून टाकलं.

**भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव का वाढला?**

२२ एप्रिल रोजीही पाकिस्तानने जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला केला होता. या हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ६ मेच्या रात्री आणि ७ मेच्या सकाळी ऑपरेशन सिंदूर करत, पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील १००हून अधिक दहशतवादी मारले गेले. भारताच्या या कृतीनंतर पाकिस्तान बिथरला होता.

## काँग्रेसची 'जय हिंद यात्रा' राजकीय; भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा आरोप

### तर 'तिरंगा यात्रा' देश सेवेसाठी असल्याचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नागपूर**



आमची तिरंगा यात्रा ही समाजाने समाजासाठी काढलेली, सर्व पक्ष आणि जाती-धर्मांची यात्रा असून काँग्रेस पक्ष मात्र जय हिंद यात्रा काढत आहे. ही राजकीय यात्रा असल्याचा आरोप भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. नागपूर येथील तिरंगा यात्रे दरम्यान त्यांनी पत्रकाराशी संवाद साधला. यावेळी त्यांनी काँग्रेस पक्षावर जोरदार निशाणा साधला आहे.


महाराष्ट्र मध्ये जवळपास दीड हजार तिरंगा रॅली काढल्या जात आहेत. प्रत्येक तहसील कार्यालयामध्ये तिरंगा रॅली काढण्यात येणार असल्याचे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. ही रॅली केवळ एका पक्षाचे आयोजन नाही. तर सर्व पक्ष आणि सर्वसामान्य नागरिकांनी या तिरंगा रॅलीचे आयोजन केले असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. प्रत्येक जाती, धर्माचा नागरिक या रॅलीमध्ये सहभागी झाला असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय सैन्याने पाकिस्तानला ज्या पद्धतीने धडा शिकवला आहे. पाकिस्तानी दहशतवाद्यांनी ज्या पद्धतीने भारताला नुकसान करण्याचा प्रयत्न केला. त्याच पाकिस्तानला घरात जाऊन मारण्याची शक्ती भारतीय सैनिकांमध्ये आहे. इतकेच नाही तर भारतीय सैनिकांनी केलेल्या पराक्रमाचे वर्णन अमेरिकेच्या वृत्तपत्रात देखील छापून आले असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे. आपल्या देशाविषयी, भारतीय सेना आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी मुळे जगभरात सन्मान वाढला आहे. आज संपूर्ण देश पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय सैनिकांसोबत असल्याचेही ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने आणि भारतीय सैनिकांनी जो पराक्रम केला आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाने या दोघांचे अभिनंदन करायला हवे. मात्र ते भारतीय सैन्यावर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देखील टीका करत आहेत. आता ते जय हिंद यात्रा ते काढत आहेत. मात्र ही राजकीय यात्रा असल्याचा आरोप चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. आमची यात्रा ही देश सेवेसाठी काढलेली यात्रा आहे. ती एका पक्षाची यात्रा नाही. तर सर्व देशसेवेसाठी काढलेली यात्रा असल्याचे ते म्हणाले. समाजासाठी समाजाने काढलेली ही यात्रा असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

## माझं बालवाङ्मय वाचायचं वय राहिलं नाही
## राऊतांच्या पुस्तकावर फडणवीसांचा खोचक टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६मुंबई**




शिवसेनेचे (ठाकरे) खासदार व प्रवक्ते संजय राऊत यांच्या 'नरकातला स्वर्ग' या पुस्तकाचं उद्या (शनिवार, १७ मे) मुंबईत प्रकाशन होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक व चित्रपट पटकथालेखक जावेद अख्तर यांच्या हस्ते या पुस्तकाचं प्रकाशन केलं जाणार आहे. शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख तथा ज्येष्ठ नेते शरद पवार व तृणमूल काँग्रेसचे खासदार साकेत गोखले यांच्या उपस्थितीत हे पुस्तक प्रकाशित केलं जाईल. या पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वीच यामधील मजकूरावरून, राऊतांनी केलेल्या काही दाव्यांवरून मोठा राजकीय गोंधळ सुरू झाला आहे. यावर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया देखील येत आहेत.

दरम्यान, प्रसारमध्यमांच्या प्रतिनिधिंनी या पुस्तकातील मजकुराबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रतिक्रिया विचारली असता, मी बालवायय (बालसाहित्य) वाचत नाही, अशी खोचक टिप्पणी केली.

संजय राऊतांच्या 'नरकातला स्वर्ग' या पुस्तकात 'राजा का संदेश साफ हैं' नावाचं एक प्रकरण असल्याचा दावा काही प्रसारमाध्यांनी केला आहे. गुजरात दंगलीसह काही गुन्ह्यांच्या प्रकरणात अमित शाह अडकलेले असताना शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांनी शाह यांना कसं वाचवलं आणि दोघांमधील कथित भेटीबद्दल सविस्तर लेखण केलं आहे. यावरून मोठं राजकीय वादळ उठलं आहे. याबाबत काही वार्ताहरांनी फडणवीस यांना प्रतिक्रिया विचारली. त्यावर फडणवीस म्हणाले, मी कादंबऱ्या वाचणं कधीच सोडून दिलं आहे. कथा-कादंबऱ्या आणि बालवायय वाचायचं माझं वय राहिलेलं नाही. असल्या गोष्टी मी वाचत नाही. तुम्ही प्रसारमाध्यमांनी त्यांना (संजय राऊत) सोडून द्या, ते कोणी मोठे नेते नाहीत.असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## बिबट्याच्या शोध सुरूच
## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण कायम

### रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पात बिबट्याची धास्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नांदगांव पेठ**



रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाच्या परिसरात बुधवारी सायंकाळी आढळलेल्या बिबट्याच्या पाऊलखुणांनंतर वन विभागाने गुरुवारपासून सुरू केलेली शोध मोहीम अद्याप निष्फळ ठरली आहे. गुरुवारी रात्री अंधारामुळे शोधमोहीम थांबविण्यात आली होती. शुक्रवारपासून वनपाल अमोल गावनेर, श्याम देशमुख, फिरोज खान तसेच वनरक्षक अतुल धस्कट आणि संदीप ठाकरे यांनी पुन्हा शोधमोहीम सुरू केली. मात्र, दुसऱ्या दिवशी देखील बिबट्याच्या हालचालींचे कोणतेही ठोस पुरावे सापडलेले नाहीत.

या घडामोडींमुळे रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातील कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच प्रकल्पाबाहेरील नागरिकांमध्येही असुरक्षिततेची भावना वाढली आहे. परिसरात सतत गस्त वाढवण्यात आली असून, वनविभागाने नागरिकांना काळजी घेण्याचे आणि रात्रीच्या वेळी शक्यतो घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे.वन विभागाच्या सूत्रांनुसार, शोधमोहीम पुढील काही दिवस सुरु राहणार असून परिसरात लावण्यात आलेल्या कॅमेऱ्यांद्वारे देखील बिबट्याच्या हालचालींचा मागोवा घेण्यात येत आहे. दरम्यान, प्रकल्प प्रशासन आणि स्थानिक पोलीस प्रशासन सतर्क असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उपाययोजना सुरू आहेत.रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाचा परिसर १३५० एकर मध्ये असून ज्या ठिकाणी कामगार काम करतात तो परिसर सोडला तर हजार एकर परिसर हा जंगल परिसर असून त्यामध्ये रानडुकरे, हरीण, ससे आदी जंगली प्राणी देखील आहेत तसेच तलाव सुद्धा आहे त्यामुळे बिबट्याला शिकार आणि पाणी मुबलक असल्याने तो याच परिसरात दडून बसला असावा अशी शक्यता वनविभागाने वर्तविली आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या जंगली परिसरात शोधमोहीम राबविणे वनविभागासाठी मोठे आव्हान ठरत आहे.

**फुलसुंगेची खरडपट्टी**

बिबट असल्याच्या बातमीची खातरजमा करण्यासाठी माध्यम प्रतिनिधींनी रतन इंडियाचे एच आर मॅनेजर अनुपम फुलसुंगे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी उद्धट व अपमानास्पद भाषेत उत्तर दिल्यामुळे बातमीमध्ये त्या संवादाचा उल्लेख करण्यात आला होता मात्र जबाबदार व्यक्तीने बेजबाबदारपणे वक्तव्य केल्यामुळे आज सकाळीच वरिष्ठांनी अनुपम फुलसुंगे यांना तब्बलएक तास खरडपट्टी करत शहाणपणाचे धडे दिले शिवाय संतप्त कामगारांनी सुद्धा फुलसुंगेची कानउघाडणी केली. यावेळी फुलसुंगेनी जाहीर माफी मागितल्याची माहिती आहे.

## ब्रह्मोससमोर चिनी संरक्षण प्रणाली फोल

### ऑपरेशन सिंदूरमुळे पाकिस्तानला मोठी किंमत मोजावी लागली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यांतर भारताने कठोर भूमिका घेत पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या तळांवर हवाई हल्ले करत ते उद्ध्वस्त केले होते. यानंतर पाकिस्तानने भारतावर हल्ले करण्याचे अयशस्वी प्रयत्न केले. पाकिस्तानच्या या प्रयत्नांना भारतीय लष्कराने सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. यानंतर संपूर्ण जगाला भारताच्या लष्करी ताकदीची झलक पाहायला मिळाली.

दरम्यान, ऑपरेशन सिंदूरचे जोरदार समर्थन करताना, एका अमेरिकन युद्ध तज्ञाने म्हटले आहे की, पाकिस्तान विरोधात भारताने आक्रमक आणि बचावात्मक या दोन्हींमध्ये वर्चस्व गाजवले. यातून असे दिसते की, भारताकडे पाकिस्तानात कुठेही, कधीही हल्ला करण्याची क्षमता आहे.

इंडिया टुडेला दिलेल्या एका विशेष मुलाखतीत, कर्नल (निवृत्त) जॉन स्पेन्सर म्हणाले की, पाकिस्तानने वापरलेल्या चिनी हवाई संरक्षण प्रणाली भारताच्या ब्रह्मोस क्षेपणास्त्रांशी जुळवून घेऊ शकत नाहीत, ज्यांचा वापर युद्धादरम्यान लष्करी तळांवर हल्ला करण्यासाठी केला जात असे. भारताने पाकिस्तानमध्ये हल्ले करण्यात व पाकिस्तानी ड्रोन हल्ले आणि हायस्पीड क्षेपणास्त्रांपासून स्वतःचा बचाव करण्यात यश मिळवले आहे.

**पाकिस्तानला मोठी किंमत मोजावी लागली**

ऑपरेशन सिंदूरमुळे पाकिस्तानला मोठी किंमत मोजावी लागली. भारताचा राजकीय आणि लष्करी संदेश स्पष्ट होता, आम्हाला युद्ध नको आहे, परंतु कोणी दहशतवाद केला तर त्याल शिक्षाही देऊ, असे माजी अमेरिकन लष्करी अधिकारी स्पेन्सर यांनी पुढे सांगितले.

## सौदी अरबपाठोपाठ पाच मुस्लीम राष्ट्रांकडून पाकिस्तानी भिकाऱ्यांची हकालपट्टी

### गृहमंत्र्यांनी थेट संसदेत आकडेवारी मांडली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६लाहोर**



सौदी अरबने गेल्या वर्षीच्या जानेवारीपासून ते आतापर्यंत ५,०३३ पाकिस्तानी भिकाऱ्यांची स्वगृही हकालपट्टी केली आहे. पाकिस्तानी संसदेत गृहमंत्री मोहसीन नकवी यांनी ही माहिती मांडली आहे. नकवी केवळ सौदी अरबमधून मायदेशी आलेल्या भिकाऱ्यांबाबतची आकडेवारी देऊन थांबले नाहीत. इतर मुस्लीम राष्ट्रांनी हकालपट्टी केलेल्या भिकाऱ्यांबाबतची माहिती देखील त्यांनी संसदेत दिली. मोहसीन नकवी म्हणाले, अनेक पाकिस्तानी नागरिक मलेशिया, इराक, संयुक्त अरब अमिराती (यूएई), ओमान व कतारसारख्या देशात भीक मागण्यासाठी जातात.

गृहमंत्री नकवी म्हणाले, आपल्या देशातील गरीब लोक इतर मुस्लीम राष्ट्रांमध्ये भीक मागण्यासाठी जात आहेत. या लोकांना वाटतं की ही सगळी (इराक, कतार, ओमान, मलेशिया, यूएई) श्रीमंत मुस्लीम राष्ट्रे आहेत. इथे जाऊन भीक मागून आपला केवळ उदरनिर्वाहच होणार नाही तर आपली आर्थिक परिस्थिती देखील सुधारू शकते. सौदी अरब दर वर्षी हजारो पाकिस्तानी भिकाऱ्यांना परत पाठवतो. त्यांनी पाकिस्तानी सरकारला आवाहन केलं होतं की हा सगळा प्रकार थांबवावा. तुमच्या देशातून भिकारी पाठवू नका असं स्पष्ट बजावलं होतं.

मंत्री मोहसीन नकवी म्हणाले, सौदी अरब, इराक, मलेशिया, ओमान, कतार व यूएईने तब्बल ५,४०२ भिकाऱ्यांना परत पाठवलं आहे. ही गेल्या १६ महिन्यांमधील आकडेवारी आहे. गेल्या चार महिन्यांत या देशांनी ५५२ भिकारी परत पाठवले आहेत.

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव

## सनातन राष्ट्राचा जयघोष करत शेकडो हिंदुत्वनिष्ठ गोव्याकडे रवाना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

मानवजातीच्या परमकल्याणासाठी, तसेच रामराज्याच्या स्थापनेसाठी कार्यरत सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने फोंडा-गोवा येथे १७ ते १९ मे या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. फार्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर हा महोत्सव होत आहे. या महोत्सवासाठी अमरावती जिल्ह्यातून सनातन संस्थेचे शेकडो साधक, हिंदू धर्मप्रेमी आणि हिंदुत्वनिष्ठ यांनी 'सनातन राष्ट्रा'चा जयघोष करत वाहन,बस,रेल्वे व विमानाद्वारे गोव्याकडे प्रयाण केले. यावेळी हिंदुत्वनिष्ठांनी भगव्या टोप्या परिधान केल्या होत्या, तसेच वाहनांवर लावलेल्या भगव्या ध्वजांमुळे वातावरणात चैतन्य पसरले होते. या प्रसंगी अमरावतीचे राज्यसभेतील खासदार डॉ. अनिल बोंडे व माजी खासदार सौ. नवनीत राणा यांनी महोत्सवासाठी सर्व साधक व हिंदुत्वनिष्ठांना शुभेच्छा दिल्या आहे.

# बच्चू कडू यांचा आवाज विधान परिषदेच्या सभागृहात गुंजणार का?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

विधानसभा निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू हे आता विधान परिषदेच्या आखाड्यात उतरण्याची तयारी करत आहेत. गेल्या काही दिवसांपासून बच्चू कडू हे अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातून निवडणूक लढवणार असल्याची चर्चा सुरू आहे. यातच आता आपण या संदर्भात शिक्षकांशी चर्चा करून त्यानंतरच निर्णय घेणार असल्याचे बच्चू कडू यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता पुढील वर्षी होणार्या या निवडणुकीत बच्चू कडू पुन्हा एकदा विधान परिषदेच्या आखाड्यात उतरण्याची तयारी करत असल्याचे दिसून येईल का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



अमरावती जिल्ह्यातील अचलपूर विधानसभा मतदारसंघात बच्चू कडू हे सलग चार वेळा निवडून आले होते. त्यांनी २००४, २००९, २०१४ आणि २०१९ या काळात सलग या मतदारसंघातून विजय मिळवला होता. मात्र नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे ते आता शिक्षक मतदार संघातून पुन्हा एकदा विधिमंडळात जाण्याची तयारी करत असल्याचे बोलले जात आहे.

अमरावती विभाग शिक्षक मतदार संघात अपक्ष आमदार किरण सरनाईक यांचे वर्चस्व आहे. किरण सरनाईक यांचा कार्यकाळ हा ६ डिसेंबर २०२६ रोजी संपणार आहे. त्यामुळे आता या मतदारसंघातून पुन्हा एकदा निवडणूक होणार आहे. त्यातच अमरावती मध्ये नुकत्याच पार पडलेल्या प्रहार शिक्षक संघटनेच्या मेळाव्यात मतदारसंघातून बच्चू कडू यांनी निवडणूक लढवावी, असा असा आग्रही पदाधिकाऱ्यांनी केला होता. त्याला बच्चू कडू यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला. मात्र आपण शिक्षकांशी चर्चा केल्यानंतरच या संदर्भात निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. अमरावती विभाग शिक्षक मतदार संघामध्ये अमरावती बरोबरच अकोला, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ या जिल्ह्यातील शिक्षकांचा समावेश होतो.

# अवकाळी पावसामुळे उघड झाला बाजार समितीचा ढिसाळ कारभार

## धान्याचे १५०० पोते भिजले; लाखो रुपयांच्या शेडमधून वाहत होती नदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती शहरात गुरुवारी दुपारी अर्धा ते पाऊण तास जोरदार अवकाळी पाऊस झाला. या पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सुमारे दीड ते दोन हजार धान्याचे पोते भिजले आहे. यामध्ये खरेदीदारांचेच धान्य जास्त असल्याने त्यांचे नुकसान अधिक झाले आहे. याचवेळी एपीएमसीने विक्रीसाठी आलेल्या धान्याच्या संरक्षणासाठी बांधलेल्या एका शेडमध्ये अक्षरश: नदी वाहत होती. संपूर्ण बाजारात मोजक्याच पोत्यांवर ताडपत्री झाकलेल्या होता. बाकी पोते मात्र पावसात भिजत होते. यावरून अमरावती बाजार समितीचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. गुरुवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. मात्र दुपारी दीड वाजता ढग दाटून आले आणि पावणे दोन वाजताच्या सुमारास पावसाला सुरुवात झाली. काही वेळातच पावसाने जोर धरला आणि अर्धा ते पाऊण तास धो-धो पाऊस पडला. या पावसापूर्वीच बाजार समितीत माल विक्रीसाठी आणलेल्या



शेतकऱ्यांच्या मालाचा लिलाव झाला होता. परंतु वजन आणि पोते भरून उचलण्याचे काम बाकी असताना पावसाने हजेरी लावली. मात्र या वेळी थोड्या पोत्यांवरच ताडपत्री झाकलेली होती.

**सचिव म्हणतात, शेतकऱ्यांचे नुकसान नाही**

शेतकऱ्यांचे अंदाजे ५० पोते भिजले असतील. बाजारात शेतकऱ्यांच्या मालाचा लिलाव सकाळी ९ व ११ वाजताच होतो. आजही लिलाव झाला होता. त्यामुळे विक्री झालेला माल खरेदीदारांचा आहे. यात खरेदीरांचे १ हजारा पोते भिजल्याचा अंदाज आहे. आम्ही आडत्यांना ताडपत्री दिलेल्या आहेत. तसेच शेडच्या दुरुस्तीसाठी डीडीआर कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवला आहे, असे बाजार समितीचे सचिव दीपक विजयकर यांनी सांगितले.

# 'एसटी'च्या ताफ्यात 'स्मार्ट बस' येणार एआय तंत्रज्ञानासह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

भविष्यात एसटीच्या प्रवाशांना सुरक्षित प्रवासा बरोबरच वक्तशीर बस सेवा देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेली स्मार्ट बसेस घेण्यात येणार आहेत. या बस मध्ये एआय तंत्रज्ञानासह काय वैशिष्टे राहणार याबाबत आपण जाणून घेऊ या.



एसटी महामंडळाकडून नव्या ३ हजार बसेस खरेदी च्या अनुषंगाने बोलावलेल्या बस बांधणी कंपन्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला एस.टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व संबंधित खाते प्रमुखां सह बस बांधणी कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी परिवहन मंत्री तथा एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक म्हणाले, नवीन लालपरी सह येणाऱ्या सर्व बसेस मध्ये ए. आय तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरे, जी.पी.एस. तंत्रज्ञान एल.ई.डी. टीव्ही, वाय-फाय, चालक ब्रेथ नालाइज यंत्रणा, याबरोबरच चोरी- प्रतिबंध तंत्रज्ञान वर आधारित (अँटी थीफ्ट टेक्नॉलॉजी) बस लॉक सिस्टम असे आधुनिक तंत्रज्ञान एकात्मिक पद्धतीने लावण्यात येणार असून या बसेस प्रवाशांसाठी अधिक सुरक्षित आणि आरामदायी असतील.

स्वारगेट बसस्थानकावरील घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेला यापुढे अत्यंत महत्त्व दिले जाणार असून , प्रवासात बसेस मध्ये प्रवाशांसोबत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसविण्यात येणार असून, चालकाच्या गाडी चालवण्याच्या पद्धतीवर देखील या कॅमेराचा तिसरा डोळा लक्ष ठेवून असणार आहे. तसेच बसस्थानक व परिसरामध्ये पार्किंग मध्ये उभ्या असलेल्या बसेस देखील पूर्णतः बंद राहतील अशी यंत्रणा बस मध्ये बसविण्यात येणार आहे. अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

नवीन बसेस मध्ये लावण्यात येणाऱ्या एल. ई. डी. टीव्ही च्या माध्यमातून जाहिराती बरोबर विविध महत्त्वाच्या घडामोडी तसेच सन्माननीय पंतप्रधान, मुख्यमंत्री यांचे संदेश तातडीने प्रवाशांच्या पर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवासात देखील प्रवासी जगभरातील घडामोडी बाबत अपडेट राहतील. तसेच बसच्या बाहेरील बाजूस देखील जाहिरात प्रसिद्धी करीता एल.ई.डी पॅनल लावण्यात येणार आहेत. यातून महामंडळाचा जाहिरात महसूल वाढण्यास मदत होणार आहे.

**फोम बेस आग प्रतिबंधक यंत्रणा**

सध्या तापमान वाढीमुळे एसटी बसेस ला आग लागण्याच्या घटना घडत आहेत. या आगीला प्रतिबंध करण्यासाठी फोम बेस आग प्रतिबंधक यंत्रणा लावण्यात येणार असून बस मध्ये ज्या ठिकाणी आग प्रज्वलित होईल, त्याचा शोध घेऊन त्या ठिकाणी संबंधित फोम वापरून आग तात्काळ विजवण्याची व्यवस्था या यंत्रणेत करण्यात आली आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रवाशांचा सुरक्षितते बरोबरच बसच्या अपघातांची संख्या कमी करणे, तसेच बस फेऱ्यांचा वक्तशीर पणा वाढवणे यासाठी देखील मदत होणार आहे. त्यामुळे भविष्यात खऱ्या अर्थाने एसटी स्मार्ट होईल. असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी व्यक्त केला.

# महामार्गावर राखेचे थैमान प्रशासन गप्प, नागरिक त्रस्त

## आ. संजय खोडके व आ. सुलभा खोडके यांच्या उपस्थितीत पाहणी झाल्यानंतर सुद्धा प्रशासनाचा गलथानपणा कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नांदगावपेठ**


गुरुवारी दुपारी झालेल्या प्रचंड हवेमुळे राष्ट्रीय महामार्गावर राखेचा हैदोस पहायला मिळाला. आ. संजय खोडके आणि आ. सुलभा खोडके यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन अधिकाऱ्यांची तसेच जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीच्या बेताल कारभाराबाबत कानउघाडणी केली. त्यांनी दिलेल्या सूचनानंतर देखील राख मानवी वस्तीपासून दूर हलविण्याऐवजी तात्पुरत्या उपाययोजनांवर समाधान मानण्यात आले. ढिगाऱ्याभोवती फक्त माती टाकून 'डोळ्यांदेखत अंधळं धोरण अवलंबण्यात आले.गुरुवारी दुपारी झालेल्या प्रचंड वाऱ्यामुळे ही राख रस्त्यावर सर्वदूर पसरली आणि काही काळासाठी महामार्गावर अंधारमय दृश्य तयार झाले.




वाहनचालकांच्या डोळ्यात राख शिरल्याने अनेकांनी गाड्या थांबवल्या. काहींनी जीव वाचवण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीनें रस्त्याच्या कडेला वाहने लावून आश्रय घेतला. नागरिकांच्या आरोग्याला आणि सुरक्षिततेला धोका निर्माण करणारी ही स्थिती असूनही, प्रशासन मात्र नागरिकांच्या मृत्यूची वाट बघत आहे.नागरिकांनी या घटनेचे व्हिडीओ व फोटो सोशल मीडियावर व्हायरल करून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला, तरीही कुठलीही ठोस कार्यवाही अद्याप झालेली नाही. आ. खोडके यांनी अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले होते, मात्र त्या आदेशांची अंमलबजावणी झाली नाही, हे विशेष.या प्रकारामुळे जनतेमध्ये संतापाची लाट उसळली आहे. 'प्रशासन राज संपुष्टात आले का?' असा सवाल आता जनतेतून उघडपणे विचारला जात आहे.

# लोणारच्या दैत्यसूदन मंदिर आजपासून किरणोत्सवला सुरुवात

## पाच दिवस दुपारी साडेअकरा ते एकच्या दरम्यान सूर्यकिरणांचा अभिषेक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६लोणार**

पौराणिक वारसा लाभलेल्या लोणार शहरात उद्या (१६ मे) पासून किरणोत्सव रंगणार आहे. मात्र, हा उत्सव मानवी 'इव्हेंट' नसून तो नैसर्गिक उत्सव आहे.त्याला पुरातन भारतीय स्थापत्य शास्त्र, खगोल शास्त्र याचा मिलाफ देखील म्हणता येईल. येथील पुरातन दैत्यसूदन मंदिरात हा सूर्य किरणांचा अद्भुत खेळ रंगणार आहे. श्री चरणी शहस्त्र सूर्य किरणे प्रकाश रुपी अभिषेक करणार आहे. यामुळे हा किरणोत्सव याची देही याची डोळा पाहण्यासाठी दूरवरचे पर्यटक आणि भाविक सरोवर नगरीत डेरेदाखल होत आहेत.

जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असलेले लोणार शहरात केवळ जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याचे सरोवरच आहे, असा कुणाचाही समज असेल तर तो चुकीचा आहे. लोणार सरोवरात आणि सभोवताली अनेक प्राचिन मंदिरे आढळून येतात, त्यातीलच एक आहे सुबक दगडी कोरीव कलाकुसर असलेले प्राचीन मंदिर म्हणजे दैत्यसूदन मंदिर शेकडो वर्ष जुने असलेले हे मंदिर शहराचा एक अनमोल ठेवा आहे. या मंदिराची कलाकुसर थेट कोणार्कच्या सूर्य मंदिराशी मिळतीजुळती असलेली आढळून येते. भगवान विष्णूंच्या दैत्य सुदन अवतारला समर्पित असलेले हे मंदिर बघण्यासाठी पर्यटकांची नियमित वर्दळ असते.

या मंदिरामध्ये १६ मे पासून सलग पाच दिवस किरणोत्सव अनुभवायला मिळणार आहे. पुढील पाच दिवसात दुपारी साडेअकरा ते एकच्या दरम्यान सूर्यकिरण भगवान दैत्य सुदन यांच्या मूर्तीला अभिषेक करताना दिसून येणार आहेत. हा प्राचीन स्थापत्य व खगोल शाश्त्रीय चमत्कार बघण्यासाठी मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी भाविकांची गर्दी सुद्धा होण्याची होणार आहे. लोणार शहरातीलच रवी जावळे यांच्या परिवाराकडून येणाऱ्या सर्व भक्तांसाठी लाडवांचा प्रसाद तयार करण्यात आला आहे. पुरातत्त्व विभागाकडून हा किरणोत्सव बघण्यासाठी येणाऱ्या भक्तांसाठी सोयीसुविधा निर्माण करण्याची अपेक्षा सर्वसामान्यांकडून व्यक्त होत आहे.

> मंदिर परिसरात पिण्याच्या पाण्याची उपलबधता करून देण्यात यावी तसेच भक्तांना उन्हापासून बचावासाठी योग्य व्यवस्था त्या ठिकाणी करावी अशी रास्त अपेक्षा भाविक व्यक्त करीत आहेत. या किरणोत्सवामुळे लोणार शहरामध्ये पर्यटकांची वर्दळ वाढणार असल्याने पर्यटनाला चालना मिळण्याचे सुखद चित्र आहे.आतापर्यंत प्रसिद्धीपासून दूर असलेला हा किरणोत्सव मागील दोन-तीन वर्षांपासून मात्र आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे, हा किरणोत्सव अनुभवण्याची संधी उद्यापासून मिळणार असल्याने शहरातील स्थानिक नागरिक असो किंवा भाविक असो सर्वांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे.या ठिकाणी येणाऱ्या सर्व भाविकांनी शांतता ठेवून स्वतः ही दर्शन घेऊन इतरांना सुद्धा दर्शनाची संधी द्यावी व शांतता ठेवावी. या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.
>
> **-निमिष मेहत्रे, पोलीस निरीक्षक, लोणार**

# नाफेड ज्वारी खरेदी पोर्टलची संथगती

## ३९६ अर्ज, पोर्टलवर ९०नोंदणी : शासकीय ज्वारी खरेदी रखडली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६चांदूर रेल्वे**


शासकीय ज्वारी खरेदीची नोंदणी नाफेडमार्फत २२ एप्रिलपासून सुरू झाली. त्याची मुदत ३० एप्रिलला संपुष्टात आली. त्यानंतर मुदत ३१ मेपर्यंत वाढविली. मात्र संथगतीमुळे आलेल्या अर्जाची नोंदणी २५ टक्केच झाली आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांचे आजपर्यंत ३९६ नोंदणीकरिता अर्ज प्राप्त झाले. पोर्टलची गती संथ असल्याने आतापर्यंत केवळ २० अर्जाची पोर्टलवर नोंदणी झाल्याची माहिती चांदूर रेल्वेचे खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष गोविंद देशमुख यांनी दिली. उन्हाळी ज्वारीच्या पेऱ्यात वाढ होऊन शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ज्वारीची लागवड केली आहे. खुल्या बाजारात ज्वारीचे दर अल्प असून शेतकऱ्यांची पसंती नाफेडच्या ज्वारी खरेदीला आहे. परंतु, ऑनलाइनमध्ये पोर्टलद्वारे ओटीपी मिळत नसल्याने नोंदणीचे काम हळुवार सुरू आहे.

# बुद्ध पौर्णिमेला मेळघाट व्याघ्र प्रकल्पात 'निसर्ग अनुभव' १९७ मचाणींवर बसून पर्यटकांनी घेतला रोमांचक अनुभव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६६अमरावती**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात बुद्ध पौर्णिमेच्या शुभ्र प्रकाशात 'निसर्ग अनुभव' कार्यक्रम उत्साहात पार पडला. निसर्गप्रेमींनी २४ तास घनदाट वनातील १९७ मचाणींवर बसून वन्य प्राण्यांच्या हालचाली आणि दर्शनाचा रोमांचक अनुभव घेतला.

सदर उपक्रमात सहभागी झालेल्या निसर्गप्रेमींना जेवण, नाश्ता, पिण्याच्या पाण्याची सोय, मचाणीवर सोडणे आणि आणण्याची व्यवस्था करण्यात आली. मचाणीवर बसण्यापूर्वी संबंधित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी आवश्यक सूचना आणि मार्गदर्शन केले. त्यानंतर निसर्गप्रेमींनी पाणवठ्यावर येणाऱ्या वन्यजीवांचे निरीक्षण केले.मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील ३ वन्यजीव विभागात ९ वाघ, ८ बिबट, ५९ अस्वल, २७२ रानगवा, ४०९ सांबर, १२५ नीलगाय प्राणी प्रत्यक्ष बघायला मिळाले. तसेच, पांढरकवडा वन्यजीव विभागात ६ वाघ, १८ अस्वल, २११ नीलगाय आणि अकोला वन्यजीव विभागात ८ बिबट, १९ अस्वल, ४ तडस व ४३ नीलगाय या वन्यजीवांचे दर्शन झाले.



पूर्वी 'प्राणीगणना' उपक्रम आता वन्य प्राण्यांच्या शास्त्रीय अभ्यासाच्या पद्धतींचा अवलंब केल्यामुळे 'निसर्ग अनुभव' हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अकोट, गुगामल, मेळघाट वन्यजीव, तसेच अकोला व पांढरकवडा या सर्व वन्यजीव विभागांमध्ये निसर्गप्रेमींनी ऑनलाईन नोंदणी करून मचाण आरक्षित केले. या उपक्रमात मुंबई, पुणे, यवतमाळ, औरंगाबाद, नागपूर, परभणी, वाशीम, बुलढाणा, अकोला, नांदेड व अमरावती तसेच मध्यप्रदेशातील निसर्गप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. 'निसर्ग अनुभव' कार्यक्रमात मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने केलेल्या उत्कृष्ट व्यवस्थापनाबद्दल सहभागी निसर्गप्रेमींनी समाधान व्यक्त केले.मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक एम. आदर्श रेड्डी, उपवनसंरक्षक जयकुमारन, सुमंत सोलंखे, विभागीय वन अधिकारी यशवंत बहाळे, उत्तम फड, श्री. निमजे, मनोजकुमार खैरनार, स्वप्नील बांगडे, अतुल तिखे आणि आनंद विपट यांनी 'निसर्ग अनुभव'साठी पुढाकार घेतला.

# आयकर विभागाच्या छाप्याने सराफा बाजार हादरला

## विभागातील पाचही जिल्ह्यातील किमान ७० टक्के सराफा बाजाराची उलाढाल बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

अकोला, परतवाडा येथील एकता ज्वेलर्सच्या दुकानावर १४ मे रोजी आयकर विभागाने धाडी टाकल्याचे सराफा बाजार वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून संबंधितांचे घरासह ज्वेलर्समध्ये तपासणी सुरू आहे. विशेष म्हणजे गुरुवारला एकता ज्वेलर्समध्ये अधिकाऱ्यांनी संगणक तसेच कागदपत्रांची, वहिखात्याची तपासणी केली. दरम्यान गुरुवार १५ मे रोजी नागपुर




शहरातील काही सराफा ज्वेलर्समध्ये आयकर विभागाने धाड टाकल्याने विदर्भासह अमरावती विभागातील सराफा बाजार हादरला आहे. व्यापाऱ्यांना तर एवढी धडकी बसली आहे की, बहुतांश सराफा व्यापाऱ्यांनी आपले दुकान व मोबाइल बंद केला आहे. सध्याघडीला विभागातील पाचही जिल्ह्यातील किमान ७० टक्के सराफा बाजाराची उलाढाल बंद आहे.आयकर विभागाने एका ज्वेलर्सच्या अमरावती, परतवाडा, यवतमाळ, अकोला येथील ज्वेलर्सवर एकाचवेळी धाड टाकली. यासह तिन्ही शहरातीलइतर ज्वेलर्सवरदेखील धाडी घालण्यात आल्या. यासह आयकर विभागाने अकोला शहरातील पूनम ज्वेलर्स, अग्रवाल ज्वेलर्स, ईशा ज्वेलर्स यांच्यावर इन्कम टॅक्सची धाड पडली आहे. मुंबई, नागपुर, औरंगाबाद आयकर विभागातील १४७ पेक्षा जास्त अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या समावेश असलेल्या विविध पथकांची अद्यापही ज्वेलर्समध्ये तपासणी सुरू आहे. सर्व ज्वेलर्समधील रक्कम, डिजिटल डेटा, खरेदी-विक्रीचे बिल, बॅकींगसह इतर सर्व प्रकारच्या व्यवहाराची कागदपत्रे तपासणे सुरू आहे. या दरम्यान यवतमाळयेथील एकता ज्वेलर्स गेल्या काही दिवसांपासून बंद आहे. धाडीमागील नेमकं करण काय आणि यामध्ये काय घबाड बाहेर येईल, हे तपासणीनंतर स्पष्ट होणार असल्याचे सुत्रांकडून समजले आहे. अश्यातच नागपुर शहरातील काही सराफा ज्वेलर्समध्ये आयकर विभागाने धाड टाकल्याने विदर्भासह अमरावती विभागातील सराफा बाजार हादरला आहे. व्यापाऱ्यांना तर एवढी धडकी बसली आहे की, बहुतांश सराफा व्यापाऱ्यांनी आपले दुकान व मोबाइल बंद केला आहे सध्याघडीला विभागातील पाचही जिल्ह्यातील किमान ७० टक्केसराफा बाजाराची उलाढाल बंद आहे.

# धामणगाव रेल्वे तालुक्यातील उसळगव्हाणमध्ये मोबाईल टॉवर धाराशाही

## १ तास धुवांधार बरसला,कांदा, संत्रा पिकांचे नुकसान




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६धा. रेलवे**

धामणगाव रेल्वे तालुक्यात गुरुवारला दुपारी दीड वाजताच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. उसळगव्हाण गावानजीक औरंगाबाद - नागपूर एक्सप्रेस हायवे जवळ मोबाईल टॉवर कोसळला यात कोणीही जखमी झालेले नाही. वीजपुरवठाही काही काळासाठी खंडित झाला होता.गुरुवारला दुपारी दीड वाजताच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. यामुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढहोतहोती, त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. मात्र दुपारी आकाशात काळे ढग दाटून आले आणि जोरदार गडगडाटासह पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे व ढगांच्या गडगडाटामुळेहवामान सुखद झाले. या पावसामुळे तापमानात घटनोंदवण्यात आली असून नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. उसळगव्हाण गावानजीक औरंगाबाद - नागपूर एक्स्प्रेस हायवे जवळ रुपेश टोंग यांच्या शेतातील मोबाईल टॉवर कोसळला यात कोणीही जखमी झालेले नाही. वीजपुरवठाही काही काळासाठी खंडित झाला होता.या अवकाळी पावसामुळे तालुक्यात कांदा व संत्रा पिकांचे मोठ्या प्रमाणत नुकसान झाले आहे.

# राज्यावर पूर्वमोसमी पावसाचे सावट

## विदर्भातील नागपूर, अमरावती, यवतमाळ, गोंदिया या जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

राज्यातील पावसाळी वातावरणाने मोसमी पाऊस यंदा लवकरच दाखल होईल याची नांदी दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात पाऊस हजेरी लावत आहे. आतातर महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रावर सध्या चक्राकार वार्यांचा प्रभाव जाणवत आहे. पश्चिम बंगालपासून झारखंड, विदर्भ, तेलंगणा ते रायलसीमा, तसेच मराठवाडा, कर्नाटक ते केरळ या संपूर्ण पट्ट्यात हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय झाले असून, त्यामुळे राज्यभर पूर्वमोसमी पावसाचे सावट आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पाऊस सुरू आहे. गारपीटीसह पाऊस झाला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पीकांचे नुकसान झाले आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला उन्हाच्या कडाक्याने हैराण झालेल्या नागरिकांना पावसाच्या शिडकाव्याने दिलासा दिला आहे.

पुणे, मुंबई, नाशिक आणि सातारा या जिल्ह्यात जोरदार वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान खात्याने या जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जाहीर केला आहे. दुसरीकडे नाशिक आणि सातारा जिल्ह्यात गारपिटीसह मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे, तर अहिल्यानगर आणि पुण्यात वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी, मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सोलापूर तर मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड यासह विदर्भातील नागपूर, अमरावती, यवतमाळ, गोंदिया या जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# सोमय्यांच्या तक्रारीनंतर नायब तहसिलदारांची ॲक्शन

## बनावट जन्माचा दाखला मिळविणाऱ्या तिघांवर गुन्हा : अचलपूर पोलिसांची कार्यवाही बांग्लादेशी घुसखोर का स्थानिक नागरिक, तपास सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अचलपूर**

राज्यातील विविध तहसिलसह अचलपुर तहसिलमधूनही अनेक बांग्लोदशी घुसखोरांनी बनावट जन्माचे दाखले मिळविले असल्याची तक्रार भाजपचे किरिट सोमय्या यांनी काही दिवसापूर्वी अचलपुर तहसिलदारांकडे केली होती. त्यानुसार अचलपुरच्या तहसिलदारांच्या पडताळणी दरम्यान तिघांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे जन्माचे दाखले मिळविले असल्याचे स्पष्ट होताच अचलपुर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याबाबत पोलीसांनी तिघांविरोधात फसवणूकीचे गुन्हे दाखल केले आहे.शेख कलीम शेख उस्मान (४६) रा. पथ्रोट, शाहाना परवीन सायीन शाह शगीर शाह, रा. कांडली, मोईन अहमद अब्दुल अजीतरा. पॅराडाईज कॉलनी, अमरावती अशी गुन्हे दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. भाजपचे नेतेकिरिट सोमय्या यांनी नाशिक, मालेगाव, भिवंडी, यवतमाळ, अकोला, अमरावती, नागपुर जिल्ह्यातील विविधं तहसिल



मधून बांग्लादेशी घुसखोरांनी बनावट कागदपत्रांव्दोर उशिरा मिळणारे जन्माचे दाखले मिळविले आहे, अशी तक्रार केली होती. याबाबत जिल्ह्यात आतापर्यंतअंजनगावसुर्जी, अमरावती शहरातील गाडगेनगर पोलिस ठाण्यात तहसिलदारांच्या तक्रारीवरून अनेकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले. एप्रिल महिन्यात अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या किरिट सोमय्या यांनी अचलपुरचे तहसिलदारांकडे त्यांच्या कार्यालयातून सुध्दा अनेक बांग्लादेशी घुसखोरांनी बनावट जन्माचे दाखले मिळविण्याची तक्रार नावाची यादी व पुराव्यानिशी केली होती. त्यानुसार अचलपुचे नायब तहसिलदार जगदीश सखारामजी मंडपे यांनी सन २०२३ पासून वितरित झालेल्या जन्माच्या दाखल्याच्या प्रकरणाचौं पडताळणी सुरूकेली. त्यादरम्यान वरीलनमूदतिन्ही आरोपींनी यांनी २६ नोव्हेंबर २०२४ ते १३ डिसेंबर २०२४ या काळात अचलपुर तहसिल कार्यालयातून बनावट कागदपत्रांच्या आधारेजन्माचे दाखले मिळविले असल्याचे निष्पन्न झाले. तिन्ही आरोपींनी - सादर केलेल्या टीसीवर खोडतोड केल्याचे निर्देशनास आले. तसेचत्यांच्या जन्म तारखेमध्ये देखील तफावत आढळली. विशेष म्हणजे तिन्ही आरोपींनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांमध्ये सुध्दा दिशाभुल करणारी माहिती आढळली. त्यानुसार नायब तहसिलदार जगदीश मंडपे यांनी अचलपुर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी तिन्ही नमूद आरोपींविरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# डिजीटल अरेस्टची धमकी देणाऱ्या तोतया सीआयडी कमिश्नरला बीडमधून अटक

## अटकेचा दम देऊन महिलेकडून उकळले होते १४.३० लाख : ४.५५ लाखाची रक्कम चेकने वटविल्याने झाला ट्रेस : शहर सायबर सेलची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

पोलिस आयुक्तालयातील सायबर सेलच्या पथकाने शहरातील तक्रारकर्त्या महिलेच्या व्हॉटपवर व्हिडीओ कॉल करून त्यांना डिजीटल अरेस्टची धमकी देत त्यांच्याकडून ऑनलाईन १४ लाख ३० हजार रूपये उकळणाऱ्या ठगबाजारास बीड येथून अटक करण्यात यश मिळविले आहे. १४.३० लाखाची रक्कम आरोपीच्या खात्यात ट्रान्सपर होताच त्याने बँकेतून चेकने रक्कम काढल्याने आरोपी हा सायबर पोलिसांच्या रडावर आला. आरोपीच्या ताब्यातून विविध बँकेचे पासबुक, चेकबुक, एटीएम कार्ड व मोबाइलसह एकूण १ लाख २० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. फैजान असद शेख (२१) रा. बिलाल मस्जिद जवळ, बीलाल नगर, इमामपुरा रोड, बिड असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, अज्ञात भामट्याने तक्रारकर्त्या महिलेच्या व्हॉट ॲपवर २४ एप्रिल रोजी व्हिडीओ कॉल केला. तेलंगाना पोलिसांकडे तुमचा सीमकार्डचा




समावेश असलेल्या अनेक तक्रारी आल्या असून तुमच्या विरोधात अटक वॉरन्ट जारी झाल्याचे ऑनलाईन ठगबाजाने सांगितले. त्यानंतर पुन्हा सी.आय.डी. कमीशनर बोलत असल्याचे सांगुन व्हीडीओ कॉल करून तुमच्यावर आणखी एक गुन्हा दाखल असल्याचे महिलेला सांगण्यात आले. एवढेच नव्हे तर हयुमन ट्रॅफीकिंगच्या गुन्हयात आपल्याला काही रक्कम मिळाल्याचे तुम्हाला अटक करण्याची धमकी दाखवुन दुसऱ्या दिवशी सुप्रिम कोर्टात हजर होण्याचे सांगीतले. सुप्रिम कोर्टात हजेरी टाळण्यासाठी आरोपींनी महिलेला २५ लाखाची मागणी केली. भितीपोटी महिलेने तिच्या एचडीएफसी खात्यातून आरोपींना १४ लाख ३० हजार ट्रान्सपर केले. याबाबत गुन्हा दाखल होताच सायबर पोलिस ठाण्यातील एपीआय अनिकेत कासार, एपीआय प्रियंका कोटावार, हेड कॉस्टेबल शैलेन्द्र अर्डक, उल्हास टवलारे, प्रशांत मोहोड, निखील माहुरे, पोलीस शिपाई सुषमा आठवले यांनी युध्दपातळीवर तांत्रिक तपास सुरू केला. सदर ट्रान्सपर झालेल्या रकमेपैकी ४ लाख ५५ हजार ९९० रूपयांची रक्कम आरोपी फैजान असद शेख याच्या पंजाब नॅशनल बँकेत ट्रान्सपर झाली असून त्याने ती रक्कम चेकव्दारे काढली असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी तातडीने बिड गाठून फैजान असद शेखला अटक केली. विविध बँकेचे पासबुक, चेकबुक, एटीएम कार्ड व मोबाइलसह १ लाख २० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# महानगर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी घेतला वैद्यकीय अधिकारी यांचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती महानगर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सर्व शहरी आरोग्य केंद्र, आरोग्य वर्धणी केंद्र चे स्त्री वैद्यकीय अधिकारी तसेच वैद्यकीय अधिकारी यांचा मासिक आढावा घेण्यात आला ह्या मध्ये माता व बाल संगोपन, असंसर्ग आजार ची माहिती, लसीकरण ची माहिती ,क्वालिटी अशुरान्स ,डेंग्यू ,मलेरिया व मान्सून पूर्व प्रतिबंधात्मक उपाय, बोगस डॉक्टर ,व शहरी आरोग्य केंद्रातील वेळोवेळी येणारे अडचणी वर कोणत्या उपाययोजना करावे ह्या बाबत संपूर्ण तीन तासाचा आढावा बैठक घेण्यात आआला ह्या बैठकीला डॉ विशाल काळे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाची



माहिती दिली व डॉ.संदीप पाटबागे डॉक्टर इन्चार्ज मुख्यालय यांनी एनसीडी पोर्टल बाबत मासिक अहवाल दिला तसेच डॉ स्वाती कोवे आर सी एच वैद्यकीय अधिकारी यांनी माता व बाल संगोपना ची व लसीकरण ची माहिती दिली आणि डॉ रुपेश खडसे साथ रोग अधिकारी यांनी डेंग्यू ,मलेरिया जलजन्य ,कीटकजन्य आजाराची तसेच मान्सून पूर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना कश्या प्रकारे करावे ह्या बाबाचा अहवाल सादर केला, डॉ फिरोज खान शहर क्षय रोग अधिकारी यांनी टी बी बाबतची माहिती दिली ,कुटंब कल्याण प्रशिक्षण केंद्रातील डॉक्टर यांनी आपातकालीन स्थितीत रुग्ण यांना सी पी आर कसा देण्यात यावा याचे प्रत्याशिक देण्यात आले ह्या आढावा बैठकीत डॉ अश्विनी खडसे, डॉ पौर्णिमा उघडे, डॉ वैशाली काकडे, डॉ मनोज मुंधढा , डॉ अल्मास खान, शहर क्षय रोग अधिकारी डॉ फिरोझ खान , डॉ वैशाली मोटघरे, डॉ मानसी मूरके, डॉ आकिब खान डॉ तरोडेकर व इतर सर्व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.


# जुना धामणगाव ग्रामपंचायत मधील साईनगर, श्रीकृष्ण पेठमध्ये भटक्या कुत्र्यांचा हैदोस ; अनेकांना घेतला चावा

## नागरिक व शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण : मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तांची नागरिकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६धामणगाव रेल्वे**

तालुक्यातील जुना धामणगाव ग्रामपंचायत हद्दीतील साईनगर,श्रीकृष्ण पेठमध्ये भटक्या कुत्र्यांनी हैदोस घातला असून अनेकांना घेतला चावा घेतला आहे.यामुळे नागरिक व शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तांची मागणी नागरिकांनी ग्रामपंचायतकडे केली आहे.

साईनगर व श्रीकृष्ण पेठ परिसरामध्ये सध्या भटक्या कुत्र्यांनी हैदोस घातला असून मॉर्निंग वॉक साठी जाणाऱ्या अनेक इसमांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना परिसरात घडल्या आहेत.



भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याची तक्रार जुना धामणगाव ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये दिनांक २९ एप्रिलला देण्यात आली.परंतु मोकाट कुत्र्यांचा अद्यापही बंदोबस्त न केल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.भटक्या कुत्र्यांमध्ये काही कुत्रे वैयक्तिक मालकीचे कुत्र्यांचा समावेश आहे. जवळपास नऊ लोकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याची घटना घडली.

वाटसरूंना चावा घेण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे.तसेच भटक्या कुत्र्यांनी गाई -गुरे व शेळ्यांना सुद्धा चावा घेतल्याची बाब पुढे आली आहे. श्रीकृष्ण पेठ व साईनगर परिसरात घडत आहे.

भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याचे निवेदन कुत्र्यांचे मालकांनाही देण्यात आले.या घटनेबाबत ग्रामपंचायत कार्यालयाला सूचना देण्यात आली आहे. मात्र नागरिकांच्या मागणीला केराची टोपली दाखवली आहे व टोलवाटोलवीची उत्तरे देत आहे.पहाटे शिकवणी वर्गाला जाणारी शाळकरी मुलांना याचा अधिक धोका लक्षात घेता ग्रामपंचायतीने तात्काळ कार्यवाही करावी अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

हनुमान मंदिर परिसर ,साईनगर,श्रीकृष्ण पेठ या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात भटक्या कुत्र्यांची भटकंती चालू असते. भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्ताची मागणी केली आहे.सदर घटनेची दखल घेऊन संबंधितांनी योग्य कार्यवाही करावी.

# ढाबा, हॉटेलात दारू प्याल तर कोर्टाची पायरी चढाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

बीअर शॉपी, वाईन शॉप यासह हॉटेल व ढाबे, काही खानावळी अमरावती जिल्ह्यात राजरोसपणे दारू पिण्याची परवानगी दिली जाते. उत्पादन शुल्क विभागाकडे त्याचा परवाना घेतलेला नसतो. अनेक ठिकाणी खुलेआम हे मद्यपान होत आहे. काही ढाब्यांवर बनावट मद्यही पिण्यासाठी उपलब्ध करून दिले जाऊ शकते. यातून आरोग्यालाही धोका निर्माण होतो. अधिकृत जागेवर व दुकानातून मद्य घेऊन सेवन करावे. गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग सक्रिय झाला आहे. आता ढाबे मालकांनाच शिक्षा केली जाणार आहे. त्यासाठी आता ढाबा मालकांचे धाबे दणाणले आहेत.

जेवणासोबत ग्राहकांना दारू पिण्याची मुभा देणार्या ढाबा मालकाला ५० हजार रुपयांपर्यंत दंड किंवा पाच वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे. त्यामुळे आता ढाबा मालकांनी विनापरवानगी आपल्या ढाबा किंवा डॉटेलात दारू पिणार्यांना कडक शब्दात मनाई करावी अन्यथा कारवाई होऊ शकते. गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग सक्रिय झाला आहे.

# पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांचा निरोप समारंभ भावूक वातावरणात पार

## अमरावती पोलिस दलाकडून शाल-श्रीफळ देऊन सत्कार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावतीचे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांची नागपूर येथे उपायुक्त पदावर बदली करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आज १६ मे रोजी दुपारी पोलिस कवायत मैदानावर त्यांच्या सन्मानार्थ निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. या वेळी अमरावती पोलिस दलातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभात रेड्डी यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.पोलिस दलातील सहकाऱ्यांनी त्यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा देत त्यांचे योगदान आणि नेतृत्व याची प्रशंसा केली. नवीनचंद्र रेड्डी यांनी आपल्या निरोप भाषणात अमरावतीतील कार्यकाळ स्मरणात ठेवण्याजोगा ठरल्याचे सांगितले. त्यांनी सहकाऱ्यांचे, नागरीकांचे आणि विविध सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळाल्याबद्दल आभार मानले. त्यांच्या कार्यकाळात अमरावतीत कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने अनेक सकारात्मक बदल घडून आले. त्यांच्या जाण्याने अमरावती पोलिस दलात भावनिक वातावरण निर्माण झाले आहे. आता ते नागपूरमध्ये उपायुक्त म्हणून नवे जबाबदारीचे कार्य स्वीकारणार आहेत.

## विमान कंपन्यांकडून प्रवाशांची लूट; पूर्ण रक्कम न देता तिकीट रद्दचे ५० टक्के रक्कम कट केले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**



भारत-पाकिस्तान देशात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यानंतर देशातील काही विमानतळे सुरक्षिततेसाठी बंद ठेवण्यात आली होती. दरम्यान, विमान प्रवाशांना तिकिटाची सर्व रक्कम संबंधित विमान कंपन्यांकडून देण्याची घोषणा करण्यात आली होती. परंतु विमान कंपन्यांकडून प्रवाशांना पूर्ण परतावा न देता तिकीट रद्द फी आकारून उर्वरित पैसे देण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित प्रवाशांकडून ग्राहक आयोगात तक्रार दाखल करण्यात येणार आहे.

'ऑपरेशन सिंदूर'नंतर देशातील चंदीगड, लेह, जम्मू, जेसलमेर व इतर विमानतळांवरील नागरी उड्डयन सेवा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. त्यामुळे लाखो प्रवाशांना पर्यायी मार्गाने निश्चित स्थळी जावे लागले. दरम्यान, पुण्यातील एक दाम्पत्य पर्यटनासाठी हिमाचल प्रदेशाला गेले होते. विमान तिकिटासाठी २८ हजार ६१८ रुपये आकारले होते. परंतु तिकीट रद्द केल्यानंतर त्यांना १५ हजार ७९२ रुपये देण्यात आले असून, १२ हजार ८३६ रुपये तिकीट रद्द फी म्हणून कापण्यात आली आहे.

दरम्यान,(दि. ८) रोजी चंदीगड ते पुणे विमानाची तिकीट काढले होते. परंतु (दि. ८) रोजी चंदीगड विमानतळ बंद होते. दरम्यान, या इमर्जन्सी काळात इंडिगो कंपनीने चंदीगड ते पुणे विमान रद्द झाली किंवा रिशड्यूल झाले, याबाबत काही कल्पना दिली नाही. शिवाय प्रवासी विमानतळावर गेल्यावर विमानतळ बंद आहे, असे सांगण्यात आले. त्यामुळे त्यांना कॅब बुक करून दिल्लीला यावे लागले. यामुळे दुप्पट खर्च करावा लागला. नंतर तिकीट रद्द केल्यानंतर इंडिगो कंपनीने ५० टक्के कॅन्सलेशन फी आकारली. विमान वाहतूक महासंचालनालयाच्या सूचनेकडे दुर्लक्ष करून प्रवाशांची लूट करण्यात येत आहे. याबाबत विमान कंपनीला फोन केले असता, संपर्क झाला नाही.

## ड्रोन हल्ल्यांवर स्वदेशी उत्तर! : नागपूरच्या SDAL कंपनीकडून 'भार्गवास्त्र'चे यशस्वी परीक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नागपूर**

नागपूरच्या सोलर डिफेन्स ॲण्ड एरोस्पेस लिमिटेड या खासगी कंपनीने 'भार्गवास्त्र' नावाची ड्रोन-विरोधी शस्त्र प्रणाली तयार केली व त्याची यशस्वीरित्या चाचणी केली आहे. हे शस्त्र ड्रोन स्वार्म म्हणजेच एकत्र येऊन हल्ला करणाऱ्या अनेक ड्रोनना एकाचवेळी नष्ट करण्याची क्षमता ठेवते.




ही चाचणी ओडिशामधील गोपालपूर येथील लष्करी चाचणी परिसरात झाली. यामध्ये 'भार्गवास्त्र'ने एकाच वेळी ६४ मायक्रो रॉकेट्स सोडले आणि त्यावर अचूक वार केला. या परीक्षणावेळी लष्कराच्या एअर डिफेन्स विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

**'भार्गवास्त्र'ची खास वैशिष्ट्ये:**

एकाच वेळी अनेक रॉकेट्स फायर करण्याची क्षमता

लहान ड्रोनपासून मोठ्या ण-त (मानवरहित विमान) पर्यंत नष्ट करण्याची क्षमता

५ ते १० किमी अंतरावर काम करू शकणारी रेंज

मोबाइल वाहनांवर बसवता येणारी, सहज हलवता येणारी प्रणाली

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापरून अचूक लक्ष्य

इलेक्ट्रॉनिक हस्तक्षेप (सॉफ्ट किल) आणि प्रत्यक्ष नाश (हार्ड किल) दोन्ही मोड्स

**आत्मनिर्भरतेकडे पाऊल**

भार्गवास्त्र ही प्रणाली पूर्णपणे भारतातच विकसित करण्यात आली आहे. यापूर्वी डऊ-ड कंपनीने 'नागास्त्र-१' नावाचा ड्रोन देखील यशस्वीरीत्या विकसित केला होता. आता 'भार्गवास्त्र'च्या माध्यमातून भारत लष्करी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आणखी एक पायरी वर चढला आहे. ही प्रणाली भारतीय लष्कराच्या गरजेनुसार अजून सुधारण्यात येत आहे. भविष्यात ही प्रणाली सीमा सुरक्षेसाठी आणि महत्वाच्या ठिकाणी ड्रोन हल्ल्यांपासून संरक्षणासाठी उपयुक्त ठरेल.

## राज्याच्या वन विभागात बदली धोरणाला बगल; 'साइड पोस्टिंग'ची अनेक पदे रिक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**




राज्याच्या वन विभागात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भातील शासन निर्णयाला बगल देत, निवडक स्वरूपात बदल्यांचे धोरण राबविले जात आहे. परिणामी 'साइड पोस्टिंग' म्हणून ओळखली जाणारी अनेक पदे वर्षानुवर्षे रिक्त आहेत.महसूल व वन विभागाने दि. २२ मे २०१७ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, प्रादेशिक, वन्यजीव, सामाजिक वनीकरण, संशोधन व प्रशिक्षण आणि मूल्यांकन या प्रत्येक विभागात अधिकारी-कर्मचाऱ्यांनी किमान तीन वर्षे सेवा देणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात केवळ वनपरिक्षेत्र अधिकारीवगळता इतरांच्या बदल्यांसंदर्भात या आदेशाला बगल दिली जात आहे.

प्रत्येक शाखेत तीन वर्षे कार्य आणि अनुभव घेण्याचे धोरण असताना बदलीसाठी मात्र प्रादेशिक उपविभागात उड्या पडत आहेत. गत पाच वर्षांपासून सहायक वनसंरक्षक, वनपाल आणि वनरक्षकांच्या बदल्या 'प्रादेशिक टू प्रादेशिक' होत आहेत.

वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा बिगुल वाजला असून, मलईदार जागेवर पोस्टिंगसाठी सत्तापक्षाच्या आमदार, खासदारांचे शिफारस पत्र मिळविण्यासाठी बदलीपात्र आरएफओंचे प्रयत्न सुरू आहेत. विश्वसनीय सूत्रानुसार प्रादेशिक परिक्षेत्रासाठी ७ ते १५ लाखांपर्यंत बोली लागत आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षकांनी बदलीसाठी लोकप्रतिनिधींचे पत्र न घेण्याचा आदेश निर्गमित केला असतानाही काही आरएफओ बदलीसाठी आमदारांचे उंबरठे झिजवत आहेत. बदली धोरणानुसार प्रादेशिक, वन्यजीव आणि सामाजिक वनीकरण अशा क्रमानुसार आरएफओंच्या बदल्यांची प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे. मात्र, वन्यजीव विभागात जाण्यास कोणीच उत्सुक नाही.

शासन आदेश २०१७नुसार बदली पात्र अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कार्यरत उपविभागाचा विचार करूनच इतर विभागांची शिफारस करणे अभिप्रेत आहे. मात्र, वनपाल, वनरक्षकांना वन्यजीव उपविभाग न देता 'प्रादेशिक टू प्रादेशिक' पोस्टिंग दिली जाते. त्यामुळे वन्यजीव, सामाजिक वनीकरण, मूल्यांकन, कार्य आयोजन या 'साइड पोस्टिंग' रिकाम्या राहतात.




वनाधिकारी असो वा कर्मचारी यांच्या बदल्या या शासन निर्णयानुसार झाल्या पाहिजेत. मात्र, या प्रक्रियेला बगल देण्यात येत असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही. तसे निर्देश संबंधितांना देण्यात येतील.

**- गणेश नाईक,**
**वन मंत्री, महाराष्ट्र**

## अमरावती महापालिकेत चाललंय तरी काय?

### जन्माऐवजी दिला मृत्यूचा दाखला मुलाऐवजी मुलीचा दाखला!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**



महापालिका मुख्यालयातील जन्म-मृत्यू नोंदणी विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या अफलातून कारभाराने सामान्य नागरिक त्रस्त झाले

आहेत. 'लक्ष्मी' दर्शनाशिवाय कागद पुढे सरकत नसल्याच्या असंख्य तक्रारी असून विभागप्रमुखांनी याकडे अक्षम्य दुर्लक्ष चालविले आहे. अशातच जन्म दाखल्याऐवजी चक्क मृत्यू प्रमाणपत्र दिल्याची आश्चर्यकारक बाब निदर्शनास आल्यानंतर या विभागाचा कारभार ढासळल्याचे स्पष्ट झाले आहे. संबंधितांना अनेकदा येरझारा मारावयास भाग पाडल्यानंतर गत आठवड्यात जन्माचा दाखला देण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार स्थानिक जमील कॉलनी येथील रहिवासी शेख गफूर यांनी अमरावती महानगरपालिका मुख्यालयातील जन्म-मृत्यू नोंदणी विभागाकडे अलताफ हुसैन नामक मुलाचा जन्म दाखला मिळण्यासाठी अर्ज सादर केला होता. यासोबत मुलाचे आधारकार्ड, जन्म तारखेचे डॉक्टरांचे प्रमाणपत्रसुद्धा जोडले होते. मात्र, महापालिका प्रशासनाने अलताफ हुसैन या बाळाचा जन्माऐवजी मृत्यूचा दाखला दिला होता. ही बाब पालकांना काही महिन्यांनंतर लक्षात आली. त्यानंतर ही कैफियत शेख गफूर यांनी जन्म-मृत्यू नोंदणी विभागात मांडली. परंतु महापालिका प्रशासनाने 'चल बुलावा आया है' अशा येरझारा मारण्यास भाग पाडले. काही कागदपत्रांची खानापूर्ती केल्यानंतर १५ एप्रिल २०२५ रोजी जन्मतारखेचा सुधारित दाखला हाती पडला. यावरून महापालिका मुख्यालयातील जन्म-मृत्यू नोंदणी विभागाचा कारभार कसा चालतो, हे स्पष्ट होते. यापूर्वी तक्रारींमुळेच तेथील एका कंत्राटी कर्मचाऱ्याला हटविण्यात आले होते, हे विशेष.

**मुलाऐवजी दिला मुलीचा जन्म दाखला**

४ एप्रिल २०२५ रोजी रूझेन मिर्झा ईमरान बेग या नावाने जन्म दाखला देण्यात आला. मात्र या प्रमाणपत्रावर पुरुषाएवेजी स्त्री असा उल्लेख करण्यात आला आहे. हा प्रकारसुद्धा कंत्राटी कर्मचाऱ्यांनी केल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे विभागप्रमुखांचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येते.

## अमरावती मधील प्रसिद्ध समाज सेविका गुंजन गोळे यांच्यावर बलात्कार करण्याची इम्रान नावाच्या इसमाकडून धमकी

### गुंजन गोळे यांना शिवीगाळ करत असल्याची ऑडिओ क्लिप वायरल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ अमरावती**




अमरावती येथील तपोवन परिसरात अनाथ व एच आय व्ही बाधित मुलांचा सांभाळ करणाऱ्या गोकुळ आश्रम च्या संचालिका गुंजन गोळे यांना एका इम्रान नावाच्या इसमाकडून फोन वरून बलात्कार करण्याची धमकी मिळाली. एवढेच नव्हे तर देशाचे पंतप्रधान यांना देखील अतिशय गलिच्छ शब्दांचा वापर केला व गुंजन व पंतप्रधान यांना अश्लील शब्दात शिवीगाळ केली.

काही दिवसापूर्वी गुंजन गोळे यांच्याकडे १६ वर्षीय एचआयव्ही बाधित मुलाला एका महिलेने त्यांच्या आश्रमात दाखल केले या मुलाची प्रकृती गंभीर असल्याने त्याच्या आईने मुलाला भेटावं म्हणून त्या आईचा फोन आला होता मात्र त्याचवेळी इमरान नावाच्या व्यक्तीने गुंजन गोळे यांना अश्लील शब्दात शिवीगाळ करून बलात्कार करण्याची धमकी दिली.

या प्रकरणी पोलिसांनी दखल घ्यावी अशी मागणी गुंजन गोळे यांनी केली तसेच सध्या इम्रान चा ऑडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे...

